**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१
दिनांक ९.१०.२००७

श्री. काशीनाथ रेवणसिध्द जावेर,
६३८, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर-५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. काशीनाथ रेवणसिध्द जावेर,
६३८, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर-५
अपीलकर्त्यातर्फे ॲड. ए.सी. बिराजदार

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. व्ही. व्ही. जगताप

मुख्याध्यापिका, लोकसेवा हायस्कूल, सोलापूर
सौ. वै.वि. तांबोळकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.७.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

१९९७ मध्ये लिपिक पदाच्या व सन २००३.०४ मध्ये प्रयोगशाळा परिचराच्या नेमणूकीबाबत सन १९९७-९८ ते २००५-२००६ मध्ये लोकसेवा हायस्कूल सोलापूर या प्रशालेत शिक्षक-शिक्षकेतरांच्या केलेल्या भरतीबाबत मान्यतेसाठी जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची व सन २००४-०५, २००५-०६ या सालामध्ये नेमणूक केलेल्या शिक्षक-शिक्षकेतरांच्या मान्यतेची व सेवक संचाच्या नकला

## विवेचन

लोकसेवा हायस्कूल , सोलापूर या प्रशालेतील शिक्षक-शिक्षकेतर सेवकांच्या सन १९९७ ते २००० पर्यंतच्या काळात मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे सादर केलेला प्रस्ताव सन २००४-०५ आणि २००५-०६ मधील नेमणुक केलेल्या शिक्षक-शिक्षकेतर यांच्या मान्यतेची व सेवक संचाची नक्कल अशी माहिती अपीलकर्ता श्री.काशिनाथ रेवणसिध्द जावेर यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, लोकसेवा हायस्कूल, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. हा अर्ज स्वीकारला नाही, याचा अर्थ माहिती देण्यास नकार, असे गृहित धरुन श्री.जावेर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. श्री.जावेर यांचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अंतर्गत असल्यामुळे त्यांचे अपील दाखल करुन घेण्याऐवजी 'आता केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ पूर्णतः अंमलात आला असल्यामुळे या अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करावा', असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी श्री.जावेर यांना दि.१७.३.२००६ रोजी कळविले. त्यानंतर जन माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापक, लोकसेवा हायस्कूल, सोलापूर श्रीमती वै.वि.तांबोळकर यांनी श्री.जावेर यांना रुपये ५५०/-चलनाने सरकारी खजिन्यात भरुन माहिती घेऊन जाण्यास कळविले. श्री.जावेर यांनी हे शुल्क भरले नाही व राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

श्री.जावेर यांनी दि.३.१.२००६ रोजी जन माहिती अधिका-यांकडे अर्ज रजिस्टर पोस्टाने पाठविला होता, परंतु त्यांनी तो स्वीकारला नाही, त्यामुळे श्री. जावेर यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अर्ज पाठविला. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हा अर्ज जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, लोकसेवा हायस्कूल, सोलापूर यांच्याकडे दि.२९.३.२००६ रोजी पाठविला व संबंधितांना माहिती देण्यास सांगितले, आणि रजिस्टर्ड पत्र न स्वीकारण्याबाबतचा खुलासा मागितला. श्री.जावेर यांचे इतर काही अर्ज आपण स्वीकारले असून त्यांना वेळेत माहिती दिली आहे, हे रजिस्टर परत गेल्याची आपल्याला कल्पना नाही, असे श्रीमती तांबोळकर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले, परंतु त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीशी विसंगत आहे. प्रशालेने रजिस्टर नाकारले आहे, असे श्री.जावेर यांचे प्रतिनिधी ॲड. ए.सी.बिराजदार यांनी स्पष्ट केले व त्याच्या पृष्ट्यर्थ टपाल खात्याच्या सोलापूर विभागातील अधिकाऱ्याचे पत्र सादर केले. श्री.जावेर यांनी माहितीच्या अधिकाराखाली मागविलेली माहिती देणाऱ्या दि.२७.९.२००७ च्या पत्रात या रजिस्टरबाबतचा घटनाक्रम दिला आहे, त्यावरुन प्रशालेत नाकारल्यामुळे हे पत्र परत पाठविल्याचे दिसते. परंतु याबाबत आपल्याला कल्पना नसल्याचे श्रीमती तांबोळकर यांनी सांगितले. श्री.जावेर यांचा अर्ज शिक्षणाधिकाऱ्यांकडून दि.२.६.२००५ रोजी प्रशालेला मिळाला, असे त्यांनी लेखी व तोंडी निवेदन केले. हा अर्ज मिळाल्यानंतर श्रीमती तांबोळकर यांनी श्री.जावेर यांना रुपये ५५०/- एवढे शुल्क चलनाने भरण्यास दि.१७.५.२००६ रोजी कळविले. रक्कम रोख अथवा मनीऑर्डरने स्वीकारता येणार नाही, असे त्यांनी या पत्रात नमूद केले. असे कळविणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या विरुध्द आहे. रक्कम रोख, मनीऑर्डरने अथवा चलनाने स्वीकारण्याची तरतूद कायद्यात असताना अशा प्रकारची भूमिका घेणे हा श्री.जावेर यांना त्रास देण्याचा प्रकार आहे. श्री.जावेर हे संबंधित प्रशालेत शिपाई असल्यामुळे अशा मार्गांनी त्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला गेला, असे प्रतिपादन ॲड.बिराजदार यांनी केले. अशी कोणतीही अडवणूक केलेली नाही व अशी अडवणुकीची भूमिका असती तर त्यांचे अन्य अर्ज स्वीकारुन माहिती दिली गेली नसती, असे प्रतिपादन श्रीमती तांबोळकर यांनी केले. त्यावेळी

कायद्यातील तरतुदींबाबत आपल्याला कलपना नव्हती, म्हणून चलनाने रक्कम भरण्यास सांगितले, परंतु त्याबाबत स्पष्टीकरण झाल्यानंतर आपण रक्कम चलनाने, मनीऑर्डरने अथवा रोख भरण्याबाबत श्री.जावेर यांना कळविले, असे त्यांनी सांगितले. आता मागितलेली बव्हंश माहिती श्री.जावेर यांनी यापूर्वी मागितली होती , ती त्यांना दि.१०.१०.२००५ रोजी दिली आहे. तीच तीच माहिती पुन्हा मागण्यामध्ये त्यांचाच उद्देश त्रास देण्याचा आहे, असा प्रतिवाद श्रीमती तांबोळकर यांनी केला.

श्री.जावेर यांनी माहिती न मिळाल्यामुळे दि.२.६.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.वसंतकुमार हाके यांनी श्री.जावेर यांना चलनाने रक्कम भरल्यानंतर श्रीमती तांबोळकर यांनी त्वरित माहिती द्यावी, असा निर्णय दिला. त्यांनीही चलनाने रक्कम भरण्यास सांगणे नियमबाह्य असल्याचा आक्षेप श्री.जावेर व त्यांचे प्रतिनिधी वकील श्री.बिराजदार यांनी नोंदविला. हा आक्षेप रास्त आहे.

श्री.जावेर यांनी कळविलेले शुल्क भरलेले नाही त्यामुळे त्यांना माहिती देण्यात आली नाही असे श्रीमती तांबोळकर यांनी सांगितले. याबाबत श्री.जावेर यांना पाठविलेले स्मरणपत्रही त्यांनी सादर केले. परंतु मूळ रजिस्टर टपाल नाकारले गेले व तीस दिवसांच्या मुदतीत माहिती दिली गेली नाही, म्हणून माहिती नि:शुल्क मिळाली पाहिजे व जन माहिती अधिकाऱ्यांवर शास्ती लावण्याची व अपिलीय अधिकाऱ्यांवर खातेनिहाय चौकशीची कारवाई करावी, अशी मागणी ॲड. बिराजदार यांनी केली. परंतु आपल्याला अर्ज मिळाल्यावर विहित मुदतीत आपण कार्यवाही केली, असे श्रीमती तांबोळकर यांनी नमूद केले. प्रशालेत श्री.जावेर यांचे रजिस्टर स्वीकारले नाही, हे स्पष्ट आहे. परंतु श्री.जावेर यांच्या अन्य अर्जांना प्रशालेने दिलेला प्रतिसाद पाहता हे एकच टपाल त्यांनी हेतुतः नाकारले असा निष्कर्ष अपिलीय प्राधिकारी म्हणून आपल्याला काढता येत नाही. दि.१४.७.२००६ रोजी शुल्क भरण्याबाबत त्यांना कळविण्यात आलेले असतानाही त्यांनी अद्याप शुल्क भरलेले नाही, तसेच आपली तक्रार नसल्याचे त्यांनी दि.२९.६.२००६ रोजी नमूद केले होते, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी नमूद केले आहे. परंतु तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी

आपल्याकडून हे दडपशाहीने लिहून घेतले असून तो निर्णय आपल्याला मान्य नसल्याचे पत्र आपण दि.१३.७.२००६ रोजी दिले असल्याचे श्री.जावेर यांनी स्पष्ट केले. या पत्राची प्रत त्यांनी सादर केली.

उभय बाजूंची निवेदने व आयोगापुढे सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता उभय बाजूंची भूमिका टोकाची व परस्परांची अडवणूक करणारी असल्याचे दिसून येते.

श्री.जावेर हे सन १९८२ पासून उपरोक्त प्रशालेत शिपाई म्हणून कार्यरत असून सन १९९७ मध्ये प्रशालेतील मुख्य लिपीक सेवानिवृत्त झाल्यानंतर सेवाज्येष्ठतेप्रमाणे त्यातील पदावर आपली नियुक्ती झाली पाहिजे, ही श्री.जावेर यांची मुख्य मागणी आहे. ही नियुक्ती न झाल्यामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे, असे श्री.जावेर यांचे म्हणणे आहे. सेवापुस्तकाप्रमाणे आपली शैक्षणिक पात्रता ही इयत्ता पाचवी आहे, सबब आपण लिपीक पदोन्नतीस पात्र नाही, असे प्रशालेने त्यांना ऑक्टोबर २००५ मध्ये कळविले आहे. मात्र आपण एस.एस.सी. उत्तीर्ण असून त्याच्या प्रती मुख्याध्यापिका व शिक्षणाधिकारी यांना सादर केल्या असूनही आपली सेवाज्येष्ठता डावलून लिपीक व प्रयोगशाळा परिचर यांची नियमबाह्य नेमणूक केली गेली, त्यामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे श्री.जावेर यांचे म्हणणे आहे. श्री.जावेर यांची शैक्षणिक अर्हता व त्यांची नियुक्ती होणे - न होणे हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेतील विषय नाही. मात्र त्यांनी मागितलेली माहिती मिळण्याचा त्यांचा हक्क आहे आणि त्यानुसार ती त्यांना मिळाली पाहिजे. त्यांचे रजिस्टर टपाल प्रशालेत स्वीकारले नाही हे अयोग्य आहे. मात्र अर्ज मिळाल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत पुढील कार्यवाही केली आहे. संबंधित माहिती न्यायासाठी दाद मागण्याकरिता आपल्याला तातडीने आवश्यक असल्याचे श्री.जावेर यांनी नमूद केले आहे. परंतु दि.१४.७.२००६ पासून आजतागायत त्यांनी ही माहिती स्वीकारलेली नाही. त्यांनी नमूद केलेली निकड विचारात घेता शुल्क भरुन माहिती घेऊन शुल्क आकारणीविरुध्द ते दाद मागू शकले असते, तसे त्यांनी केलेले नाही.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्याच्या मूळ अर्जाबाबत झालेली हेळसांड लक्षात घेता अपीलकर्त्याला माहिती मिळण्यासाठी कळविलेल्या रुपये ५५०/- ऐवजी त्यांच्याकडून रुपये २२५/- एवढेच शुल्क

घेण्यात यावे, उर्वरित शुल्काची रक्कम रुपये २२५/- जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी भरावी.

याबाबतचा पूर्तता अहवाल दि.२०.१०.२००७ पर्यंत आयोगाला पाठवावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दिनांक :- ९ /१०/२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.उध्दव नामदेव ढवळे
मु.पो.वडगाव रासाई, ता.शिरुर, जि.पुणे    अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
तहसीलदार शिरुर, ता.शिरुर, जिल्हा पुणे

जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय, शिरुर    उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उध्दव नामदेव ढवळे, मु.पो.वडगाव रसाई, ता.शिरुर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, ता.शिरुर, जिल्हा पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसिलदार कार्यालय, शिरुर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.३.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.५.२००६ |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

(१) मौजे वडगाव रासाई गट क्र.३०६ चा पूरनुकसानीचा पंचनामा का केला नाही याची कारणे मिळावीत.
(२) गट क्र.३०३/३०४/३०५/३०७ या गटाचे पंचनामे कोणत्या निकषावरुन केले आहेत त्याची कारणे मिळावीत.
(३) गट नं.३०६ चा विहित नमुन्यामध्ये प्राथमिक अर्ज देऊनही पंचनामा केला नाही त्याची योग्य कारणे मिळावीत.

## विवेचन

मौजे वडगाव रासाई येथील गट क्र.३०६ च्या पूर नुकसानीचा पंचनामा न करण्याच्या कारणाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.उध्दव नामदेव ढवळे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, ता.शिरुर यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री.ढवळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरुर यांच्याकडे अपील केले. 'आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती देण्याची तजवीज करावी', असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. परंतु आपल्याला खरी माहिती देण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असा त्याचा अर्थ लावून श्री.ढवळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जुलै-ऑगस्ट २००५ मध्ये आलेल्या पुराच्या संदर्भातील हा विषय आहे. पूरग्रस्तांना शासकीय मदत देण्यात आलेली होती. त्यातील पिकांच्या नुकसानभरपाईवाटपात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करुन श्री.ढवळे यांनी ही माहिती मागितली होती. श्री.ढवळे यांच्या गट क्र.३०६ असून शेजारी गट क्र.३०३, ३०५ व ३०७ यांचे पंचनामे कोणत्या निकषावरुन केले याची माहितीही त्यांनी मागितली होती. 'गट क्र.३०६ चा शेतपिकांचा नुकसानीबाबत पंचनामा नजरचुकीमुळे राहून गेलेला आहे', असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांनी त्यांना कळविले. श्री.ढवळे यांनी दिलेल्या अर्जानुसार त्यांच्या गटांची स्थळपहाणी करुनतालुका कृषी अधिकारी, शिरुर यांच्याकडे दि.१९.२.२००६ रोजी आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला असल्याचेही

जन माहिती अधिकाऱ्यांनी पत्रात नमूद केले आहे. अन्य गट क्रमांकांचे पंचनामे 'शासनाच्या आदेशान्वये व निकषानुसार कामगार तलाठी / कृषी सहाय्यक / ग्रामसेवक यांच्या मार्फत करण्यात आले असल्याची' माहिती त्यात दिली आहे. परंतु ही माहिती खोटी असून हेतूपुरस्सर आपलाच गट वगळण्यात आला असल्यामुळे नेमकी माहिती मिळावी, असे नमूद करुन श्री.ढवळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार शिरुर, जिल्हा पुणे यांच्याकडे अपील केले. आपल्याला पिकांची नुकसानभरपाई कधी व कशी मिळेल अशी पूरक विचारणा त्यांनी त्यात केली. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कायद्यानुसार 'माहिती ' या सदरात समाविष्ट होणारी माहिती देण्यात आली असल्याचे नमूद केले व आवश्यक त्या संबंधित कागदपत्रांच्या प्रती देण्याची तजवीज करण्याचा आदेश दिला. अर्जदाराकडून माहितीसाठी होणारे शुल्क घेण्याची सूचना या आदेशात नमूद असल्यामुळे श्री.ढवळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.ढवळे यांची मूळ मागणी नुकसानभरपाई मिळण्याची असून त्या अनुषंगाने पंचनामा न होण्याबाबतचा खुलासा त्यांनी मागितला आहे. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खुलासा मागणे, तसेच नुकसानभरपाई देण्या-न देण्याच्या कार्यवाहीचा विषय माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाही. अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे आपल्यावर अन्याय झाला व नुकसानीबाबतची खरी माहिती दडविण्यात येऊन आपले नुकसान केले गेले, अशी त्यांची तक्रार आहे. माहितीच्या अधिकारान्वये 'माहिती ' या संज्ञेखाली येणारी माहिती श्री.ढवळे यांना देण्यात आली आहे, नजरचुकीने पंचनामा करावयाचा राहिला याबाबत चौकशी करण्यात येत आहे, असे निवासी नायब तहसीलदार श्री.ए.के.देशमुख यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. पूर येऊन गेल्याला दोन वर्षे उलटली तरी आपल्याला आपल्या मागणीबाबतची नेमकी माहिती मिळत नाही, अशी तक्रार श्री.ढवळे यांनी केली. ती रास्त आहे.

उभय बाजूंच्या निवेदनाचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्याच्या मागणीसंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह दि.१७.१०.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्याला निःशुल्क द्यावी.

**पुणे**
**दि.१०.१०.२००७**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

14

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी
११८५/ख-२, दुसरी गल्ली, राजारामपुरी,
कोल्हापूर-४१६ ००८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
श्री. द.रा. मेहेंदळे शिक्षण संस्था, लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर

३. **अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

१. **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
हरिहर हायस्कूल, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

२ **जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

३. **जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
जिल्हा परिषद, कोल्हापूर

४. **जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
श्री. द.रा. मेहेंदळे शिक्षण संस्था, लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३+७२+७३+५२+१५५+७१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.१०.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी, ११८५/ख-२, दुसरी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर-४१६ ००८

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, श्री. द.रा. मेहेंदळे शिक्षण संस्था, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. रामराव बळवंत माळी

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. डी. जी. जाधव

३. **अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद गोसावी

१. **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, हरिहर हायस्कूल, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. सुधाकर विठ्ठल लवटे

२. **जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद गोसावी

३. **जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. प्रकाश दत्तात्रय कदम

४. **जन माहिती अधिकारी** तथा सचीव, श्री. द.रा. मेहेंदळे शिक्षण संस्था, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. रामराव बळवंत माळी

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५३/कोल्हापूर | २६.५.२००६ | ६.७.२००६ | २४.७.२००६ | -- |
| ७२/कोल्हापूर | २०.११.२००६ | -- | २९.१२.२००६ | १०.१.२००७ |
| ७३/कोल्हापूर | २८.९.२००६ | -- | १३.१२.२००६ | २९.१२.२००६ |
| ५२ /कोल्हापूर | १३.३.२००६ | २०.५.२००६ | ६.५.२००६ | २३.६.२००६ |
| १५५/कोल्हापूर | २८.३.२००६ | १०.४.२००६ | २१.४.२००६ | १९.६.२००६ |
| ७१/कोल्हापूर | १९.१०.२००६ | ५.११.२००६ | २२.११.२००६ | २८.११.२००६ |

८ <u>मुळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

<u>अपील क्र. ५२ /कोल्हापूर :</u>

(माहितीचा कालावधी : सप्टेंबर १९९३ ते सप्टेंबर २००६)

आपले सेवाविषयक प्रलंबित प्रश्न, सेवानिवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, शाळेचे आर्थिक व्यवहार इत्यादी विषयाच्या अनुषंगाने ३२ मुद्दयांची माहिती (सहा उप मुद्यांसह )

<u>अपील क्र. ७२ / कोल्हापूर :</u>

(माहितीचा कालावधी : सप्टेंबर १९९३ ते नोव्हेंबर २००६)

वरील विषयाच्या अनुषंगाने २२ मुद्यांची (सहा पोट मुद्यांसह ) माहिती

<u>अपील क्र. ७३ / कोल्हापूर</u> :

(माहितीचा कालावधी : सप्टेंबर १९९३ ते सप्टेंबर २००६)

४१ पोट मुद्यांसह २४ मुद्दे

<u>अपील क्र. ५३, ७१, १५५ / कोल्हापूर</u> :

श्री. द.रा. मेहेंदळे शिक्षणसंस्था व या संस्थेचे हरिहर हायस्कूल यांचे कामकाज, सेवानिवृत्ती वेतन व भविष्य निर्वाह निधीविषयक प्रस्ताव, संस्थेचे संबंधित ठराव इ. माहिती

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरीलप्रमाणे माहिती विविध अर्जांद्वारे मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी यातील काही माहिती दिली, परंतु पूर्ण माहिती न दिल्याच्या कारणावरुन श्री. कुलकर्णी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, श्री. द.रा. मेहेंदळे शिक्षण संस्था यांच्याकडे अपिले केली. त्याची दखल न घेतल्याच्या कारणावरुन श्री. कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

उपरोक्त विषयाच्या संदर्भात श्री. कुलकर्णी यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उप संचालक, कोल्हापूर उपविभाग, कोल्हापूर, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालय, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री. द.रा. मेहेंदळे शिक्षण संस्था, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर यांच्याकडेही माहिती मागणारे अर्ज केले असून अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपिले दाखल केली. त्यांच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले दाखल केली आहेत.

वरील सर्व अपिले श्री. कुलकर्णी यांचे सेवाविषयक प्रलंबित प्रश्न, निवृत्ती वेतन, सेवा पुस्तक, दक्षतारोध या संदर्भातील आहेत. संस्थेच्या ठरावांचा तपशील, सेवा पुस्तकातील नोंदी, विद्यार्थी व शिक्षक आदिंकडून विविध कारणांसाठी घेतलेल्या रकमांबाबत काढलेल्या लेखी सूचनांच्या प्रती, काही कागदपत्रे नष्ट करण्यासंबंधीच्या संस्थेच्या / शाळा समितीच्या ठरावाच्या प्रती, श्री. कुलकर्णी यांच्याविषयीचे सेवा निवृत्ती व भविष्य निर्वाह निधीबाबतचे प्रस्ताव, शिक्षणाधिकारी / शिक्षण उप संचालक कार्यालयाकडून आलेले / झालेले पत्रव्यवहार व त्याला दिली गेलेली उत्तरे, १९९४ पासून आपण पाठविलेल्या पत्रांच्या संदर्भातील कार्यवाही इत्यादी स्वरुपाची विस्तृत माहिती या सर्व अर्जांमधून मागितली आहे. तसेच त्या अनुषंगाने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ व्यतिरिक्त अनेक अर्ज विविध पातळ्यांवर केले आहेत.

जवळ जवळ चौदा वर्षांच्या कालावधीतील व अत्यंत विस्तृत अशी माहिती श्री. कुलकर्णी सातत्याने मागत आहेत, ती संस्थेने वेळोवेळी त्यांना पुरविली आहे. परंतु त्यांच्या अर्जांचे व तक्रारींचे प्रमाण, अपेक्षित असलेली माहिती, त्यासाठी लागणारे मुनष्यबळ व वेळ आणि त्या अनुषंगाने होणारा खर्च हे लक्षात घेऊनही संस्थेवर ताण पडत असतानासुध्दा वेळोवेळी त्यांना माहिती पुरविली आहे, असे संस्थेचे सचीव श्री. रामराव बळवंत माळी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले.

संस्थेचे सचीव हे माहिती अधिकारी नाहीत, असे असतानाही श्री. कुलकर्णी यांनी त्यांना माहिती अधिकारी असे संबोधून माहिती मागितली; त्यांनी ती न दिल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. परंतु मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी व सचीव हे अपिलीय प्राधिकारी असे असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी हे या संदर्भात अपिलीय

प्राधिकारी नाहीत, असे त्यांना कळविण्यात आले. यात त्यांच्या अपिलाची दखल न घेण्याचा प्रश्न नव्हता, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, श्री. डी. जी. जाधव यांनी अपील क्र. ७२ च्या संदर्भात स्पष्ट केले.

श्री. कुलकर्णी यांचे दुबार सेवापुस्तक पूर्ण करुन देणे, दक्षतारोध व रजा मंजूर करणे, सेवा पुस्तकातील वेतन नोंदीची पडताळणी करणे, सेवाखंडाच्या प्रस्तावास मंजुरी देणे, वेतनवाढीच्या संदर्भातील फरकासह द्यावयाची रक्कम अदा करणे हे श्री. कुलकर्णी यांचे मुख्य विषय आहेत. याबाबत संस्थेच्या, तसेच शिक्षण उप संचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्या पातळ्यांवरुनही कार्यवाही झाली आहे, असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद गोसावी आणि संस्थेचे सचीव श्री. रामराव बळवंत माळी यांनी आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट केले व त्याला पुष्टी देणारी कागदपत्रे सादर केली. वेतनवाढीनुसारची फरकाची रक्कम श्री. कुलकर्णी यांना प्राप्तही झाली असल्याचे त्यांनी नमूद केले. श्री. कुलकर्णी पेन्शन अदालतमध्ये हजर राहिले नाहीत, त्यामुळे त्यांचे अर्ज तेथे निकाली काढले गेले. स्वतःच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या संदर्भातील प्रस्तावाबाबत आवश्यक बाबींची पूर्तता त्यांनी केलेली नाही, तसेच भविष्य निर्वाह निधी संदर्भातील आवश्यक अर्ज त्यांनी पूर्ण करुन दिले नाहीत. त्यांनी या पूर्तता केल्यास त्यांचे मूळ प्रस्ताव संस्थेतर्फे पुढील मंजुरीसाठी त्वरित सादर केले जातील, असे मुख्याध्यापक श्री. सुकुमार विठ्ठल लवटे व सचीव श्री. रामराव बळवंत माळी यांनी सांगितले. तसेच अशा प्रकारची लेखी हमी त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद गोसावी व शिक्षण उप संचालक कार्यालय यांनाही दिली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. डी. जी. जाधव यांनी लेखी व तोंडी नमूद केले. परंतु संस्थेने तयार केलेला आपल्या सेवानिवृत्ती वेतनाबाबतचा प्रस्ताव व भविष्य निर्वाह निधी संबंधातील कागदपत्रे वादग्रस्त आहेत, त्यात अनेक त्रुटी आहेत, आपले नुकसान करणारी व अन्यायकारक अशी ही कागदपत्रे असल्यामुळे आपण त्यावर सह्या केलेल्या नाहीत. आपल्याला मागितलेली माहिती मिळाल्यानंतर न्यायालयात दाद मागण्याचा आपला विचार असल्यामुळे आपल्याला संपूर्ण माहिती मिळावी, ती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री. कुलकर्णी यांनी केले. सर्व पातळ्यांवर पडताळणी होऊन तयार केलेले प्रस्ताव असल्यामुळे ते योग्य आहेत,

त्यात कोणताही अन्याय करण्याचा प्रश्न नाही. नियमानुसार त्रुटी दर्शविल्यास त्या दूर करण्याचे सहकार्य करण्यास आपण तयार आहोत, असे मुख्याध्यापक श्री. लवटे यांनी नमूद केले.

श्री. कुलकर्णी यांनी केलेले अर्ज, निवेदन व अपिले यांमध्ये मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत आहे, हे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. आवश्यक ती माहिती त्यांना देण्याबाबत संस्थेकडून प्रयत्न झालेले आहेत, ती न देण्याचा उद्देश नाही, असे संस्थेने पुरविलेली कागदपत्रे व श्री. कुलकर्णी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत केलेली कार्यवाही यावरुन, तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून दिलेले निर्णय व आयोगापुढे केलेले निवेदन यावरुन दिसून येते.

संबंधित प्रस्तावात उणिवा आहेत की नाहीत, हा उभयपक्षी वादाचा विषय आहे. प्रस्ताव योग्य की सदोष, भविष्य निर्वाह निधीबाबतची कागदपत्रे योग्य की अयोग्य, प्रलंबित प्रश्नांवरील कार्यवाही हा राज्य माहिती आयोगाच्या कक्षेतील विषय नाही. मात्र श्री. कुलकर्णी यांनी एवढ्या मोठया प्रमाणावर माहिती मागितली आहे की त्याचा सर्व तपशील देणे संस्थेच्या कामकाजाच्या दृष्टीने जिकिरीचे आहे, आपण ही माहिती नाकारू शकलो असतो, परंतु तसे केलेले नाही, हे मुख्याध्यापक व सचीव यांचे म्हणणे रास्त आहे, हे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते. कोणती माहिती द्यावयाची राहिली आहे, हा तपशील श्री. कुलकर्णी यांनाही स्वतंत्रपणे नोंदवावा लागेल, हे सुनावणीदरम्यान स्पष्ट झाले. अपील क्र. ५२ च्या संदर्भात अशा माहितीची यादी त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना यापूर्वीच दिली आहे. संस्थेकडील अभिलेखांची पाहणी करुन आवश्यक ती माहिती त्यांनी नमूद करणे व संस्थेने ती पुरविणे हे उभयपक्षी वेळेच्या व सोयीच्या दृष्टीने अधिक योग्य ठरेल. उभय बाजूंनी याप्रमाणे कार्यवाही करावी.

वरील स्थिती लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## <u>आदेश</u>

१. अपिले अमान्य.

२. अपील क्र. ५२ वगळता इतर सर्व अपिलांच्या संदर्भात अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी अ) दिलेली माहिती ब) द्यावयाची राहिलेली माहिती अशी यादी परस्परांना दि. १५.११.२००७

पर्यंत सादर करावी, त्याची एक प्रत आयोगाला पाठवावी. कोणतेही भाष्य न करता नेमकेपणाने केवळ माहितीचा तपशील नमूद करणारी अशी ही यादी असावी.

३. वरील यादीच्या अनुषंगाने उभय बाजूंनी यादी सादर केल्यापासून पाच दिवसाच्या आत आपल्याकडील कार्यवाहीचा अहवाल आयोगाला पाठवावा.

४. संस्थेने अपीलकर्त्याला अभिलेख पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. त्यातील आवश्यक त्या नकला नि:शुल्क द्याव्या. मात्र अशा नकलांची संख्या दोनशेपेक्षा जास्त असल्यास पुढील प्रतींसाठी योग्य ते शुल्क आकारावे.

५. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांची भूमिका सकारात्मक आहे, त्यामुळे शास्ती नाही.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ३१.१०.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, ( पुणे विभाग), यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१
दिनांक ६.१०.२००७

श्री. एम. इब्राहीम अलीसाहेब बागवान,
३५५२, नागपूरकर मठाजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५ + १७७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. एम. इब्राहीम अलीसाहेब बागवान,
३५५२, नागपूरकर मठाजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. व्ही. व्ही. जगताप

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९५ / सोलापूर | २४.१.२००६ | २०.२.२००६ | १३.३.२००६ | -- |
| १७७ / सोलापूर | ३.३.२००६ | -- | -- | -- |

## अपील क्र. ९५/ सोलापूर

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

१. अंजुमने तरगीब तआलीम, अक्कलकोट शाखा, अँग्लो उर्दू हायस्कूल, पंढरपूर येथील सौ.एन.जे.शेख यांना शिक्षिका (शिक्षण सेवक) म्हणून नियुक्ती देणाऱ्या विश्वस्तांची नावानिशी व अधिकृत असल्याच्या पुराव्यानिशी माहिती

२. अनधिकृत विश्वस्त सौ. बेगमपल्ली यांच्याबद्दल अहवाल क्र.११२०/९९ हा फेटाळण्यात आलेला आहे. फेटाळण्यात आल्यानंतर सौ. एन. जे. शेख यांना नियुक्ती केलेली आहे व पुनश्च मे.लातूर कोर्टाने सुध्दा फेटाळलेला आहे व या नंतर मे. लातूर कोर्टाने नियुक्तीस मनाई हुकूम केलेला आहे. अशा सर्व परिस्थितीत सौ. शेख यांचा प्रस्ताव मान्यतेकरिता पाठविण्यात आलेला आहे ही शासनाची फसवणूक नाही का व हा प्रस्ताव कोणत्या आधारे मान्यतेकरिता पाठविण्यात आला आहे

३. सौ. एन. जे. शेख यांची नियुक्ती करणेकामी केलेल्या शालेय समितीच्या चेअरमन व इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्यासह प्रोसीडिंग बुकावर केलेल्या ठरावाची छायांकित नक्कल

४. १९९६ ते २००४ व २००४ ते आजतागायत संस्थेचे अधिकृत विश्वस्तांची व शालेय समितीच्या चेअरमन व पदाधिकाऱ्यांची नावानिशी माहिती

५. सौ. एस.आर.सय्यद यांच्याकडून घेतलेल्या चार्ज यादीची व डेडस्टॉक रजिस्टरची छायांकित प्रत

६. प्रशालेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची नावानिशी अर्हतासहीत माहिती व शिक्षकांच्या वेळापत्रकाची छायांकित प्रत

७. प्रशालेत इतिहास हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकाचे नावानिशी माहिती

## अपील क्र. १७७/ सोलापूर

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

१. सन १९९२ पासून अँग्लो उर्दू हायस्कूल,पंढरपूर प्रशालेत बिजगणित, भूमिती शिकविणाऱ्या शिक्षकांची नावानिशी व शैक्षणिक अर्हतासहीत माहिती, सदर विषयाची शैक्षणित अर्हता नसताना विषय शिकवता येतात का, व कसे

२. शिक्षणाधिकारी माध्यमिक यांच्याकडून नियुक्ती व बदल्या करु नये असे पत्र दिलेले असताना सौ. एन.जे.शेख यांचा प्रस्ताव कोणत्या आधारे पाठविण्यात आला
३. सौ. एन.जे.शेख यांच्या कोणत्या आधारे हजेरी पुस्तकावर सह्या घेतात
४. श्री. शेख एम.एम. सेवक यांना सेवेत घेताना शालेय समितीच्या व चेअरमन व इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्यासह प्रोसीडिंग बुकाची छायांकित प्रत
५. P.E. शिकविणाऱ्या शिक्षकाची नावानिशी माहिती
६. सध्या सायन्स I, II शिकविणाऱ्या शिक्षकांचे नावानिशी, अर्हतासहीत संपूर्ण माहिती

## विवेचन

अंजुमने तरगीबे तआलीम, अक्कलकोट व त्यांची शाखा अँग्लो उर्दू हायस्कूल, पंढरपूर यातील सौ.एम.जे.शेख यांना शिक्षक (शिक्षण सेवक) म्हणून नियुक्ती देणाऱ्या विश्वस्तांची नांवे व ते अधिकृत असल्याचे पुरावे, श्री.एम.एम.शेख यांना सेवेत घेताना झालेल्या कामकाजाच्या प्रोसीडिंग बुकची छायांकित प्रत, सन १९९२ पासूनची बिजगणित; भूमिती; तसेच इतिहास; विज्ञान या विषयाच्या शिक्षकांची नांवे; अर्हता इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री.एम. इब्राहीम अलीसाहेब बागवान यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अँग्लो उर्दू हायस्कूल, पंढरपूर, जि.सोलापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती चुकीची देणे, नाकारणे, दिशाभूल करणारी देणे व नष्ट करणे इत्यादी कारणांवरुन श्री.बागवान यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून श्री.बागवान यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.एम.इब्राहीम अलीसाहेब बागवान हे अंजुमने तरगीबे तआलीम या संस्थेचे माजी संचालक आहेत. या संस्थेच्या तीन शाळा असून सर्व ठिकाणी संस्थांतर्गत वाद आहेत, असे उपस्थित सर्वांनी आयोगापुढील सुनावणीत मान्य केले. श्री.बागवान यांनी दि. १३.३.२००६ रोजी प्रथम अपील केले होते व दि.२८.६.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. आयोगापुढील अपिलाच्या सुनावणीची पूर्वसूचना मिळाल्यानंतर दि. १८.९.२००७ रोजी अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी घेतली, असे श्री.बागवान यांनी लेखी व तोंडी नमूद केले. सौ.एन.जे.शेख यांच्या संदर्भातील प्रोसीडिंग बुकच नष्ट केले गेले व बेकायदेशीर नियुक्ती करुन त्याला शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद,

सोलापूर यांची मान्यता घेतली आहे. या मान्यतेला शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी स्थगिती दिली आहे. अशा स्वरुपाच्या विषयांबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री.बागवान यांनी केले. पंढरपूर येथील प्रशालेच्या मुख्याध्यापकपदी आपली नियुक्ती झाली तेव्हा पहिला काही काळ आपण रुजू व्हावे अशी परिस्थितीही नव्हती. श्री.बागवान व अन्य काही मंडळी आपण रुजू होण्यास सातत्याने विरोध करीत असल्यामुळे आपल्याला प्रचंड ताण सहन करावा लागला, त्यामुळे रुजू होईपर्यंत माहिती देणे शक्य नव्हते. तसेच त्यानंतरच्या उपलब्ध कागदपत्रातील सर्व माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.एस.एम.कुमठे यांनी सांगितले. श्री.कुमठे यांना रुजू होण्यास प्रतिबंध करणारे कोणतेही कृत्य आपण केलेले नाही, असे श्री.बागवान यांनी स्पष्ट केले.

विश्वस्त / संचालक यांचे अधिकृतपण - अनधिकृतपण हा संस्थेतील वादाचा मुख्य विषय आहे. त्यातून ठराव, कामकाज, नेमणुका याबाबत सातत्याने वाद-प्रतिवाद चाललेले असतात, त्यामुळे संस्थांतर्गत वाद, व त्यामुळे न्यायालय व धर्मादाय आयुक्त यांच्याकडे असलेले दावे-प्रतिदावे आणि त्यातील निकाल यामुळे नेमकेपणाने निर्णय देणे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या आवाक्यापलीकडचे असते, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी स्पष्ट केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.वसंतकुमार हाके यांनी सुनावणी न घेण्याचे हे कारण असल्याचे श्री.वीर यांनी सांगितले. तसेच कोणताही निर्णय दिल्यास विविध प्रकारांनी त्याला विविध पातळ्यांवर आव्हान दिले जाते व आरोप-प्रत्यारोप होतात, असे श्री.वीर यांनी तपशीलवार नमूद केले. आपल्याला जाणीवपूर्वक माहिती दिली गेली नाही व अनधिकृत मंडळी मनमानी करीत आहेत, म्हणून आपल्याला संघर्ष करावा लागतो आहे, असे प्रतिपादन श्री.बागवान यांनी केले. अशा अर्जांच्या व्दारे व विविध प्रकारे ठराविक गट आपल्याला त्रास देत असून त्याचा आपल्यावर प्रचंड मानसिक ताण आहे, असे श्री.कुमठे यांनी नमूद केले.

उभय बाजूंचे निवेदन व कागदपत्रे विचारात घेता संस्थांतर्गत वादाचा एक भाग म्हणून माहिती देणे वा न देणे याचा उपयोग उभय बाजूंतर्फे केला जात आहे, असे दिसते. न्यायालयीन स्वरुपाच्या विविध मंचांचे निर्णय वेगवेगळे असल्यामुळे विश्वस्तांचे/संचालकांचे अधिकृतपण व निर्णयाचे

रास्तपण ठरविणे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कक्षेतील नाही व त्यामुळे निर्णायक असे मतप्रदर्शन करणे व निर्णय देणे अवघड होते, हे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.वीर यांचे म्हणणे रास्त आहे. या स्थितीत मुख्याध्यापकांच्या कक्षेतील उपलब्ध माहिती अर्जदाराला देणे, तसेच अर्जदाराला आवश्यक ती कागदपत्रे अवलोकनार्थ उपलब्ध करुन देणे व त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अर्जदाराने मागणी करुन घेणे आवश्यक आहे. '...ही शासनाची फसवणूक नाही का', यासारखे अभिप्राय मागणारे प्रश्न माहितीच्या अधिकार अधिनियमातील 'माहिती' च्या व्याख्येत बसत नाहीत. त्यामुळे तशी विचारणा गैरलागू आहे. विषयाचे स्वरुप व अनुषंगिक परिस्थिती लक्षात घेता विलंबाबाबतचे जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. त्यामुळे शास्ती अथवा नुकसानभरपाई नाही.

वरील सर्व विवेचनाचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) शास्ती अथवा नुकसानभरपाई नाही.

(३) प्रोसीडिंग बुकच्या प्रतींसह उर्वरित माहिती अपीलकर्त्यास सात दिवसात द्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या दिवशीच (दि.२७.९.२००७) दिले आहेत, त्याचा पूर्तता अहवाल दि. २०.१०.२००७ पर्यंत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला पाठवावा. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी या कार्यवाहीवर लक्ष ठेवून त्याबाबतचा अहवाल आयोगाला दि.२०.१०.२००७ पर्यंत स्वतंत्रपणे सादर करावा.

**पुणे**

**दिनांक :- ६/१०/२००७**

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे**